**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकर पांडुरंग चव्हाण
मु.पडवळवाडी, ता.वाळवा, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, वाळवा,
ता.वाळवा, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, वाळवा(इस्लामपूर), ता.वाळवा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७ / सांगली / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१४.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शंकर पांडुरंग चव्हाण
मु.पडवळवाडी, ता.वाळवा, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, वाळवा,
ता.वाळवा, जि.सांगली श्री.विजय पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, वाळवा(इस्लामपूर), ता.वाळवा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.१.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>पडवळवाडी, ता.वाळवा येथील रास्त भाव दुकानातील रॉकेल वितरणाबाबत.<br>सन २००५ ते २००६. कौटुंबिक शिधापत्रिका संख्या, गॅसधारकांची संख्या, सिलेंडर एक/दोन यांना मिळणारे रॉकेल. श्री.शंकर पांडुरंग चव्हाण शिधापत्रिका क्र.१२८ वर केलेला रॉकेल पुरवठा. रॉकेल विक्रीचा दर, कोणती रजिस्टरे, वह्या व नोंदवह्या ठेवणे बंधनकारक आहे. रॉकेलचा मंजूर कोटा (मंजूर, वितरित, शिल्लक). कौटुंबिक शिधापत्रिका धारकांची अद्ययावत यादीची सत्यप्रत. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.शंकर पांडुरंग चव्हाण यांनी पडवळवाडी, तालुका वाळवा येथील स्वस्त धान्य दुकानांबाबतची व गॅस, रॉकेल वितरणाबाबतची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वाळवा यांनी विहित मुदतीत श्री.चव्हाण यांना शुल्क भरण्याबाबत कळविले. शुल्क भरल्यावर पाठविलेल्या माहितीच्या लिफाफ्यावर श्री.शंकर पांडुरंग चव्हाण या नावा ऐवजी शंकर पांडुरंग कदम असे नांव लिहिले गेल्यामुळे हे पत्र श्री.चव्हाण यांना मिळाले नाही. त्यानंतर सहाय्यक गावकामगार तलाठ्यामार्फत माहिती पाठविण्यात आली. परंतु ती उशिरा व चुकीची असल्याच्या कारणावरुन व आपल्याला वेळेत माहिती मिळू नये, यासाठीच असे केले गेल्याचे नमूद करुन श्री.चव्हाण यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील केल्याचे राज्य माहिती आयोगाकडील अपिलात नमूद केले आहे.

दि.१८.३.२००८ रोजी आयोगाने पुणे येथे आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त जन माहिती अधिकारी, अपिलीय प्रधिकारी व अपीलकर्ता यांची एकत्र चर्चा होऊनही एकमत होऊ शकले नव्हते. आपल्याला विलंबाने, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देण्यात

आली असून तिची पडताळणी व्हावी, असे श्री.चव्हाण यांनी त्यावेळी नमूद केले. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन आयोगाने दि.१४.५.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेतली.

श्री.चव्हाण यांचा अर्ज दि.१२.१.२००६ रोजी प्राप्त झाला होता. दि.१६.१.२००६ रोजी त्यांना शुल्काबाबतचे पत्र पाठविण्यात आले. दि.१४.२.२००६ रोजी त्यांनी शुल्क भरल्यानंतर दि.१५.२.२००६ रोजी त्यांना माहिती पाठविण्यात आली. लिपिकाच्या चुकीमुळे त्यांचे आडनाव चव्हाण ऐवजी कदम असे लिहिले गेले, त्यामुळे त्यांना ते पत्र मिळाले नाही. वाळवा टपाल कचेरीतून लिफाफा परत आल्यानंतर सहाय्यक गावकामगार तलाठ्यामार्फत समक्ष माहिती देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री.जी.टी.बिराजदार यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. श्री.चव्हाण यांनी प्रथम अपील केल्याचे म्हटले असले तरी आपल्याकडे अपील केलेले नव्हते, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, वाळवा यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले.

आपल्याला मिळालेली माहिती खोटी असल्याची तक्रार श्री.चव्हाण यांनी आयोगापुढील सुनावणीत केली. सन २००४ पासून आपल्याला रॉकेल पुरवठा करण्यात आलेला नाही, त्याबाबत तक्रार करुनही दाद मिळत नाही, असे प्रतिपादन श्री.चव्हाण यांनी केले. आपल्या शिधापत्रिकेवर रॉकेल देणे बंद केलेले आहे, ते सुरु व्हावे, ही श्री.चव्हाण यांची मुख्य मागणी आहे. सर्व पत्रव्यवहारात व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील निवेदनातही त्यांनी ती नमूद केली आहे. संबंधित दुकानदाराने ठेवलेल्या युनिट रजिस्टरमधील चुका दुरुस्त करण्यात आल्या व दुकानाचा परवाना रद्द करण्यात आला आहे. मात्र श्री.चव्हाण यांची शिधापत्रिका दोन सिलेंडर गॅसधारक म्हणून नोंद असल्याने नियमानुसार त्यांना रॉकेल देता येत नाही, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री.जी.टी.बिराजदार यांनी नमूद केले. दिलेली माहिती बरोबर असल्याचा तपशिलवार खुलासा जन माहिती अधिकारी श्री.जी.टी बिराजदार व अपिलीय प्राधिकारी श्री.विजय पाटील यांनी दि.१७.५.२००८ च्या निवेदनाद्वारे आयोगाला सादर केला.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता कर्मचाऱ्यांच्या हस्तदोषात्मक चुकीमुळे आडनाव चुकल्याने श्री.चव्हाण यांना काही दिवस विलंबाने माहिती मिळाली, असे दिसते. श्री.एच.एन. धुमाळ व श्री.पी.व्ही कुलकर्णी हे या चुकीला जबाबदार असून त्यांना लेखी समज देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. माहिती हेतुतः नाकारल्याचे सिध्द होत नाही. तसेच संपूर्ण माहिती देण्यात आली असून श्री.चव्हाण हे बेकायदेशीरीत्या रॉकेल मिळविण्यासाठी माहितीच्या अधिकारात अर्ज देऊन प्रयत्न करीत आहेत, असे श्री.जी.टी.बिराजदार यांनी निवेदनात नमूद केले आहे.

उपलब्ध माहिती श्री.चव्हाण यांना देण्यात आली असून ती टाळण्याचा जन माहिती अधिकाऱ्यांचा उद्देश सिध्द होत नसल्यामुळे ते शास्तीस पात्र ठरत नाहीत. तसेच श्री.चव्हाण यांनी योग्य त्या प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अपील केलेले नव्हते. अपीलकर्त्याला रॉकेल पुरवठा देय नसल्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी नियमानुसार माहिती दिली आहे. श्री.चव्हाण यांची ही मागणी हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१७.९.२००८

सप्टेंबर-४३-४६

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मंदार बिराज खोलकुंबे
विलिंग्डन कॉलेज कॅम्पस्, बंगला नं.४,
विश्रामबाग, सांगली ४१६४१५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलगुरु,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकुलगुरु,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७० / सांगली / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१४.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मंदार बिराज खोलकुंबे
विलिंग्डन कॉलेज कॅम्पस, बंगला नं.४,
विश्रामबाग, सांगली ४१६४१५

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलगुरु,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.अरुण चि.पोवार

**जन माहिती अधिकारी** तथा उपकुलगुरु,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.अरुण चि.पोवार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>उत्तरपत्रिकेची फेरतपासणी, पुनर्मूल्यांकन- तक्रार निवारण समितीची कामकाजदर्शक रुपरेषा, मार्गदर्शक तत्त्व व त्याच्या नियमावलीसह छायांकित प्रती. पुर्नमूल्यांकनासाठी घेतल्या जाणाऱ्या फी च्या विनिमयाचा सविस्तरपणे तपशील दर्शविणाऱ्या नियमाची छायांकित प्रत. एप्रिल-२००६ मध्ये बीबीए-३ परीक्षेत सीट नं.१११४ च्या फायनान्शियल मॅनेजमेंट विषयाची मॉडेल उत्तरपत्रिका तयार केली त्याची छायांकित प्रत. उत्तरपत्रिका तपासणाऱ्या प्राध्यापकाचे नांव, फेरतपासणी व पुर्नमूल्यांकन केलेल्या प्राध्यापकाचे नांव व त्यांनी केलेल्या कामकाजाच्या अहवालाच्या प्रती, वापरलेल्या वाहनांची लॉगशिटची प्रत. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.मंदार बिराज खोलकुंबे हे शिवाजी विद्यापीठाने मार्च २००६ मध्ये घेतलेल्या बीबीए भाग-३ या परिक्षेत अनुत्तीर्ण झाले. संबंधित विषयाच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत त्यांनी मागितली, त्यातील दोन प्रश्नांच्या उत्तरांना दिलेले गुण चुकीचे असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्या संदर्भात शिवाजी विद्यापीठाकडे त्यांनी केलेल्या तक्रारीवर शिवाजी विद्यापीठाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने त्यांनी माहिती मागितली होती. ही माहिती आपले जीवित व स्वातंत्र्य यांच्याशी निगडित असल्यामुळे ४८ तासात द्यावी, अशी श्री.खोलकुंबे याची मांगणी होती. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी ते अमान्य करुन तीस दिवसात माहिती दिली जाईल असे कळविले. त्यानुसार उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत फेरपडताळणी व तक्रार निवारण समितीच्या संदर्भातील माहिती दिली. त्याविरुध्द श्री.खोलकुंबे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे अपील न करता राज्यपालांकडे तक्रार केली व नंतर राज्य माहिती आयोगाकडे अपील केले.

श्री.खोलकुंबे तक्रार निवारण समितीच्या निर्णयाविरुध्द कार्यवाहीची अपेक्षा करीत आहेत, परंतु पुनर्मूल्यांकनाबाबतीत तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम असतो, ही नियमातील तरतूद त्यांना स्पष्टपणे कळविण्यात आली आहे. संबंधित माहिती त्यांना देण्यात आली असून आपल्याला दिलेले गुण चुकीचे व अन्यायकारक असल्याची त्यांची तक्रार हा माहितीच्या अधिकारातील विषय नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रभारी परीक्षा नियंत्रक श्री.अरुण पोवार, प्रतिनिधी अपिलीय प्राधिकारी तथा कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी आयोगापुढील सुनावणीत केले.

आपल्याला इन्फोसिसमध्ये नोकरी मिळाली होती व कामही सुरु झाले होते. परंतु अन्यायकारक निकालामुळे ती गमवावी लागली व एक चांगली संधी आपल्या हातून निघून गेली. विद्यापीठाच्या कार्यपध्दतीतील त्रुटी व बेजबाबदारपणा यामुळे आपले नुकसान झाले असे श्री.खोलकुंबे यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. त्यांच्या वतीने सुनावणीला उपस्थित असलेले श्री.मिलिंद पांडव यांनी हेच विस्ताराने मांडले. तक्रार निवारण समितीच्या कार्यपध्दतीबद्दल श्री.खोलकुंबे यांनी आक्षेप घेतले आहेत. तक्रार निवारण समितीची बैठक दि.१३ जुलै २००६ ला झाल्याचे कळले, त्यावेळी समितीचे अध्यक्ष परगावी असल्याचे कळल्यावरुन आपण वाहनांची व त्या दिवशीच्या लॉगशीटची माहिती मागितली परंतु ती देण्यात आली नाही, असेही श्री.खोलकुंबे यांनी निवेदनात नमूद केले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ८(ग)(ज) व (ड) अन्वये समितीचे कामकाज प्रवास व वापरलेल्या वाहनांची लॉगशीट देता येणार नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.खोलकुंबे यांना कळविले असून त्याबाबतची कागदपत्रे उभय बाजूंनी सादर केली आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करता श्री.खोलकुंबे यांना आवश्यक असलेली माहिती देण्यात आली आहे, मात्र तक्रार निवारण समितीच्या कार्यपध्दतीबाबतचे शंकानिरसन सर्वच विद्यार्थ्यांच्या दृष्टीने होण्यासाठी पारदर्शकतेने माहिती दिली जाणे आवश्यक होते, ती दिलेली नाही.

समितीची कार्यपध्दती, बैठकांच्या तारखा; उपस्थिती आदि तपशील, वाहन वापर व लॉगशीट ही माहिती ८(ग)(ज)व (ङ) (जन माहिती अधिकाऱ्यांच्या पत्रात त्याचा उल्लेख 'ड' असा चुकून झाला असावा) नुसार नाकारण्याचा निर्णय योग्य नाही. या कलमातील तरतूद या संदर्भात लागू होत नाही त्यामुळे ही माहिती दिली जाणे आवश्यक आहे. परीक्षकांचे नाव, पत्ता इ.तपशील न देण्याचा विद्यापीठाचा निर्णय योग्य आहे. मात्र विद्यापीठ माहितीच्या अधिकाराबाबत तत्पर असून माहिती लपविली जात नाही, असे कुलगुरु डॉ.माणिकराव साळुंके यांनी लेखी नमूद केले आहे. या स्वागतार्ह भूमिकेला अनुसरुनच परीक्षापध्दती व तक्रार निवारणाची कार्यपध्दती यांची योग्य माहिती नागरिकांना उपलब्ध होणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने तक्रार निवारण समितीच्या संबंधित बैठकीची तारीख, उपस्थित सदस्यांची नावे , वाहनाचा वापर व लॉगशीट ही माहिती अपीलकर्त्यास दिली पाहिजे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) वाहन वापर व लॉगशीटची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्याला आठ दिवसात निःशुल्क द्यावी व पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२२.९.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. ११, १२ व २४.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७१२ / पुणे | श्री. कांताराम तात्याबा काळे मु.पो. घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, काळेवाडी दरेकरवाडी ता. आंबेगाव, जि. पुणे | विस्तार अधिकारी, (पंचायत), पंचायत समिती, आंबेगाव, जि. पुणे | ग्रामपंचायत काळेवाडी, दरेकरवाडी यांनी दि.१.७.१९९८ रोजीचे ठरावा प्रमाणे ग्राम पंचायत हद्दीत किती स्टॅंड पोस्ट दिली आहेत,डिपॉझिट पोटी किती रक्कम जमा व त्या अनुषंगाने माहिती | माहिती दिली आहे. |
| २ | ३०० / पुणे | श्रीमती अर्चना वासुदेव भावटनकर रा. किर्लोस्कर ऑईल इंजिन समोर, भोईटेनगर मालाजी बाग, खडकी, पुणे-३ | विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, वागळे इस्टेट, इंदिरानगर ठाणे | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, ९, डब्ल्यूएच मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई- ३८ | टेंडर क्र.जी.टी. आर. ३०, ३१, ३२ याबाबत विविध मुद्दयांची माहिती | अपीलकर्ता गैरहजर. मूळ अर्जाप्रमाणे फी आकारून माहिती दिली आहे.पुरवणी मागणीनुसार दोन वेळा अपील-कर्त्यास संधी दिली असता उपस्थित राहत नाहीत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ५८९/ पुणे | डॉ. अशोक माधव माईनकर माईनकर हॉस्पिटल, मेन रोड, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा कुटुंब कल्याण मातावल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे-१ | संचालक, आरोग्य सेवा कुटुंब कल्याण, मातावल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे-१ | लॅप्रोस्कोप्स व अनुषंगिक उपकरणे यांच्या दुरूस्तीसाठी दि. १५.६.२००५ व दि. ११.७.२००६ रोजी केलेल्या विनंती अर्जावरील कार्यवाहीची माहिती, नवीन लॅप्रोस्कोप मिळावा ही प्रमुख मागणी | मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. मात्र अपील-कर्त्याच्या मागणीनुसार नवीन लॅप्रोस्कोप प्राधान्याने देण्यात येईल, यावर एकमत. अपील निकाली काढावे. |
| ४ | २५७/ पुणे | श्री. अजय दत्ताराम पाठक रा. १४१८-अ, सदाशिव पेठ, पुणे-३० | सरकारी कामगार अधिकारी, कामगार उप आयुक्त, पुणे जिल्हा यांचे कार्यालय, पुणे-मुंबई रस्ता, पुणे-५ | सहाय्यक कामगार आयुक्त, कामगार उप आयुक्त, पुणे जिल्हा यांचे कार्यालय, पुणे-मुंबई रस्ता, पुणे-५ | नोंदणी क्र. सदाशिव /१४०८/मे.विजय स्टील या संस्थेच्या नोंदणीसाठी आलेल्या अर्जापासून आज पर्यंतची माहिती | नोंदणी क्र.१४०८ ची माहिती हवी होती. ७४३५ ची कळविली. पंधरा दिवसात माहिती देण्याबाबत एकमत. |
| ५ | ६२०/ पुणे | श्री. वासुदेव कोदूमल इदनानी रा. २७/३, पी. डब्ल्यू. डी. क्वार्टर्स, पिंपरी कॉलनी, पुणे- १७ | जयहिंद सिंधू एज्यूकेशन ट्रस्ट, द्वारा जयहिंद हायस्कूल, पिंपरी कॉलनी, पुणे-१७ | सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग, पुणे | सौ. ज्योतीकास मलकानी यांच्या बाबत नेमणुक, शैक्षणिक पात्रता व तत्सम इतर माहिती | माहिती दिली, मात्र उशिरा दिली. अपील निकाली काढण्यावर एकमत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ९४२ / पुणे | श्री. सुरेश नथु शिंदे (सुतार), अर्चना विहार, फ्लॅट नं.१२, लक्ष्मीनगर, पिंपरी चिंचवड लिंक रोड, चिंचवड, पुणे-३३ | निवासी नायब तहसीलदार, मुळशी, ता.मुळशी, जि.पुणे | तहसीलदार, मुळशी, ता.मुळशी, जि.पुणे | मौजे म्हाळुंगे ता. मुळशी, जि. पुणे येथील खाते क्र. ६२ चे वाटपाचे वेळी चुकीने ०.८ आर क्षेत्र ७/१२ उताऱ्यातून कमी आले, फेर नोंदणी अर्जाबाबत | एकत्रित झालेल्या चर्चेनुसार माहिती बाबत अपीलकर्त्याचे समाधान झाल्याचे लेखी नमूद केले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.
२. अपील क्र. ७१२ व ६२० मध्ये जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागितलेली माहिती ३० दिवसात दिली गेली पाहिजे, याची समज जन माहिती अधिकारी यांना देण्यात येत आहे.
३. अपील क्र.५८९ मध्ये अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. अपील क्र. २५७ मध्ये आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत आयोगाला अहवाल सादर करावा.
४. वरीलप्रमाणे पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी कारवाईस पात्र ठरतील.

**पुणे**
**दि.** २३.९.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि ०८.१०.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७२२/ सोलापूर | श्री. अरूण रावसाहेब पवार मु.पो.घाणेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर | मुख्याध्यापक, शोभाताई घोलप विद्यालय घाणेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर | शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद ,सोलापूर | सन २००३ ते २००७ पर्यंत समाजकल्याणकडे पाठविलेल्या शिष्यवृत्तीचे प्रस्ताव, पाठविले नसल्याची कारणे | माहिती मिळाल असल्याने तक्रार राहिल नसल्याचे अपीलकर्त्याचे दि.७.१०.२००८ रोजीच्य पत्रान्वये निवेदन जन माहिती अधिकारी यांन सादर केले. |
| २ | ६५२/ सोलापूर | श्री. पोपट दादू मोरे मु. पो. दहिगाव, ता. माळशिरस, जि. सोलापूर | तालुका कृषि अधिकारी, माळशिरस, ता.माळशिरस जि. सोलापूर | उपविभागीय कृषि अधिकारी, माळशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर | सन २००४ - ०५ ते २००६-२००७ मध्ये ठिबक सिंचनाचे किती प्रस्ताव आहेत, सबसिडी मिळालेल्या शेतक-यांची यादी, तसेच गांडूळ खत प्रस्ताव व सबसिडी मिळालेल्या शेतक-यांची यादी तसेच गांडूळ सेंटर प्रस्ताव किती आले व किती मंजूर केले, त्याची यादी व इतर प्रकारच्या बाबतची माहिती. | अपूर्ण माहिती मिळाली व अस्पष्ट दिसणारी माहित अपीलकर्त्याने स्वत काढून घेतली असून तक्रार राहिलेली नसल्याचे अपीलकर्त्याने लेखी नमूद केले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ४३३/ सोलापूर | श्री. गोरखनाथ आनंदराव घाडगे मु. पो. शिवणे ता. सांगोला जि. सोलापूर | तालुका कृषि अधिकारी, सांगोला, जि. सोलापूर | उपविभागीय कृषि अधिकारी, पंढरपूर, जि. सोलापूर | सन १९९० पासून रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवडीची माहिती, अनुदान रकमेसह व यादीसह | माहिती तयार असून शुल्क भरण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले. परंतू त्यांनी संपर्क साधला नाही. शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी नमूद केले. |
| ४ | ६४१/ सोलापूर | श्री. जालिंदर महादेव चंदनशिवे मु.पो.पाकणी, ता.उत्तर सोलापूर, जि. सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, पाकणी, ता.उत्तर सोलापूर, जि. सोलापूर | गटविकास अधिकारी पंचायत समिती, उत्तर सोलापूर, जि. सोलापूर | दलित वस्ती सुधारणा कामी सन २००२ ते २००६ पर्यंत किती कामे केली, त्यांच्या खर्चाची माहिती. | माहिती घेवून जाण्याबाबत अपीलकर्त्यास कळ ते. तसेच गावातील पंचासमक्ष पंचनामा करून त्याची प्रत अपीलकर्त्याच्या पत्यावर चिटकवली अपील कर्त्यावर गुन्हे नोंद असल्याने तो फरारी असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी नमूद करून माहिती प्रत सादर केली. |

आयोगाचा आदेश पुढील प्रमाणे :

**आदेश**

वरील तक्त्यातील अपिले ( क्रमांक १ ते ४ ). निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

पुणे
दि.३१ .१०.२००८

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य (पुणे विभाग) यांच्यासमोर

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ०८.१०.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता

| अ. क्र. | अपिल क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७२५/ सोलापूर | श्री. रामलिंग सिद्राम कवचाळे मु.पो.बोराळे मंगळवेढा, जि. सोलापूर | जिल्हा हिवताप अधिकारी, पंढरपूर, जि.सोलापूर | सहा संचालक, आरोग्य सेवा (हिवताप) विश्रांतवाडी पोलिस स्टेशन समोर, येरवडा. पुणे-६ | श्री. एस. बी. म्हेत्रे, क्षेत्र कार्यकर्ता यांच्या सन १९९४- सन २००७ या कालावधीतील प्रवासभत्ता व कामाच्या डाय-यां -बाबत एकूण ३ मुद्दयांची माहिती. | माहिती प्राप्त झाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने निवेदनात नमूद केले आहे. |
| २ | ८४३ + ८४४ /सोलापूर | श्री. संदिपान सावळाराम गायकवाड, ७२५/१/२३ शिवाजीनगर, बार्शी, जि.सोलापूर | उपअभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर | गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर | मौजे काटेवाडी- बांगरवाडी या रस्त्याची व चारे पैगरी रोड व आगळगांव भागातील रोजगार हमी योजनेबाबतची माहिती | माहिती पहावयास मिळाली. त्यामुळे अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने निवेदनात नमूद केले आहे. |
| ३ | ७४८/ सोलापूर | श्री. सिकंदर महंमद तांबोळी मु. पो. पांडे, ता.करमाळा, जि. सोलापूर | ग्रामसेवक, ग्रमपंचायत, पांडे. ता. करमाळा. जि. सोलापूर | गटविकास अधिकारी, पंचायत समिती, करमाळा, जि. सोलापूर | ग्रामपंचायत, पांडे येथील ग्रामपंचायत सदस्याबाबत, सार्वजनिक गटारे. घरपटटी व अंदाजपत्रकाबाबत एकूण ६ मुद्दयांची माहिती. | माहिती मिळाल्याने. अपील निकाली काढावे, असे अपीलकर्त्याने निवेदनात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | १२९/ सोलापूर | श्री. रामचंद्र प्रल्हाद पवार, बालाजीनगर, आदर्शनगर. बार्शी, ता. बार्शी. जि. सोलापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत, पुरी, ता. बार्शी, जि. सोलापूर | गटविकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शी. जि. सोलापूर | मौजे पुरी, ता. बार्शी येथील गट नं ९४ मधील घराच्या नोंदी, व नाव नोंदणी करताना सादर करण्यात आलेली कागदपत्रे इत्यादीबाबत माहिती. | माहिती प्राप्त झाल्याने अपील निकाली काढावे, असे अपीलकर्त्याने निवेदनात नमूद केले आहे. |
| ५ | ७०६/ सोलापूर | श्री. शिवाजी हणमंत सुगरे सलगर वस्ती, डोणगाव रोड, सोलापूर | कक्ष अधिकारी सा.प्र. वि. १, जिल्हा परिषद, सोलापूर | उपमुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशा), जिल्हा परिषद, सोलापूर | सन १९९५ साली श्री. एस. एम. गवळी वगैरे रोजंदारी कर्मचा-यांना वरिष्ठ सहाय्यक या पदावर दिलेल्या नियुक्तीच्या अनुषंगाने माहिती. | माहिती प्राप्त झाल्याने अपील निकाली काढावे, से अपीलकर्त्याने निवेदनात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.२८.१०.२००८

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७२६ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | सचिव, तालुका सिव्हिल सेवा निवृत्तांची संघटना, ता. राहुरी, जि. अहमदनगर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे | हजर |

अपीलकर्ता सचीव, राहुरी तालुका सिव्हिल सेवा निवृत्तांची संघटना, राहुरी, जि. अहमदनगर यांनी श्री. पुष्पहार देठे यांचे मुख्याध्यापक पदाचे वेतन निश्चित करून सेवानिवृत्त वेतन सुधारित करण्याबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी पाठविलेला अहवाल, संचालनालयाची पत्रे व शासन स्तरावरील मार्गदर्शनाची छायांकित प्रत मागितली होती.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत नियम ६ नुसार माहिती मिळविण्यासाठी नागरिकाने स्वतःच्या नावाने अर्ज करणे आवश्यक आहे, त्यामुळे पदाच्या नावे असलेला अर्ज मान्य करता येणार नाही. तरीही माहिती देण्यात आली असल्याचे व माहिती दिल्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उप संचालक, पुणे यांनी अपील फेटाळल्याचे अपीलकर्त्यास कळविले, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १० .९.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.५.२००८ व दि. १२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७२८ / पुणे | अंकुश नथू बोरगे मु.पो.करंदी, ता.भोर,जि. पुणे | क्षेत्रिय वन अधिकारी, वनपाल, ता.बारामती | उप वन सरंक्षक, पुणे वन विभाग, पुणे | मौजे तरडोली, ता. बारामती येथील गट नं.२० बाबत वन खात्यासंबंधी माहिती व तद्अनुषंगिक शासन निर्णयांच्या प्रतींची मागणी | अर्जानुसार माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने समक्ष मान्य केले. |
| २ | ५३१ / पुणे | श्री. रमेश देवराम टाकळकर मु.पो. पिंपळे जगताप ता. शिरूर, जि. पुणे | माहिती अधिकारी, कृषि उत्पन्न बाजार समिती, सब मार्केट चाकण ता.खेड, जि. पुणे | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. खेड, जि. पुणे | १. कृषि उत्पन्न बाजार समितीकडे लेखी तक्रार केल्यास किती दिवसात कार्यवाही करतात. २. कांदा बारदाना आदेश अंमल बजावणी झाली किंवा कसे. ३. दि. १९ मे च्या अर्जावर काय कार्यवाही केली. | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ नुसार बाजार समितीने त्यांची माहिती प्रसिध्द करणेबाबत एकमताने ठरले. अपिले निकाली ठेवण्याबाबत एकमत झाले. |

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये दि.२१ व २२.८.२००८ रोजी उपरोक्त नमूद केलेल्या अपिलांचा समावेश करण्यात आला होता. अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी परस्परांशी विचारविनिमय करुन अपेक्षित माहितीबाबत निष्कर्ष नमूद करावा असे या कार्यक्रमाचे स्वरुप आहे. त्यानुसार या घटकांमधील चर्चेअंती माहितीबाबत एकमत होऊन अपिले निकाली काढण्याबाबत उभय बाजूंचे एकमत झाल्याचे प्रपत्रात लेखी नमूद केले आहे. चर्चेअंतीचा निष्कर्ष नोंदवून त्यानुसार कार्यवाहीचे आदेश देऊन ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) वरील तक्त्यात नमूद केलेली अनुक्रमांक ७२८ व ५३१ ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(२) विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयपक्षी एकमत झाले आहे, असे ज्या अपिलांमध्ये नमूद केले आहे त्यानुसार पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. ३०.९.२००८ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

(३) यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी कारवाईस पात्र ठरतील.

**पुणे**
**दि.** १० .९.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि ०७.१०.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७२९/ सोलापूर | श्री. प्रशांत सावता जाधव रा. यशोदिप. (पुजारवाडी) सांगोला ता सांगोला जि. सोलापूर | चिटणीस (महसूल शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | उपविभागीय अधिकारी, माढा विभाग,कुर्डुवाडी, ता. माढा, जि. सोलापूर | सिध्देश्वर प्रशाला, सोलापूर येथे तलाठी या पदाच्या दि.२४.६.२००७ रोजीच्या घेण्यात आलेल्या परीक्षेतील बैठक क्र. ५०११०४ बाबत एकूण ३ मुद्दयांची माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत निवेदनात नमूद केले आहे. |
| २ | ७१७/ सोलापूर | श्री. सूर्यकांत कृष्णा माने. मु. पो. ओझेवाडी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | मुख्याध्यापक, श्री. भैरवनाथ विद्यालय, सरकोली ता. पंढरपूर जि. सोलापूर | अध्यक्ष/ सचिव श्री. भैरवनाथ पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ, सरकोली, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | अपीलकर्त्यास माहिती १० दिवसांत उपलब्ध करून देण्याचे जन माहिती अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यांनी निवेदनात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ७०२/ सोलापूर | श्री. दत्तात्रय तुकाराम गायकवाड मु.पो. कडलास, ता. सांगोला, जि. सोलापूर | प्राचार्य, न्यू इंग्लिश स्कूल, ज्युनियर कॉलेज सांगोला, ता. सांगोला जि. सोलापूर | सचिव, सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर | शैक्षणिक वर्ष २००६-२००७ २००७-२००८ या कालावधीतील सेवकसंच, विद्यार्थ्यांची संख्या याबाबत एकूण ४ मुद्दांची माहिती. | आवश्यक ती माहिती मिळाली असल्याने अपील निकाली काढावे, असे अपीलकर्त्याने दि. ६.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविलेल्या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांनी निवेदना सोबत सादर केली आहे. |
| ४ | ७२३/ सोलापूर | श्री. मुकुंद डोंगरी काटे. रा.आवसे वस्ती, आमराई, सोलापूर | अध्यक्ष, उदय विकास विद्यालय, सोलापूर | प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | श्री. ज्ञानेश्वर सो. पवार यांच्या कायम केलेल्या प्रती व याबाबतच्या ठरावांच्या नकला. | जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करून देण्याचे निवेदनात नमूद केले आहे. |
| ५ | ७२४/ सोलापूर | श्री. मुकुंद डोंगरी काटे. रा.आवसे वस्ती, आमराई, सोलापूर | सचिव, सहयाद्री शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर | प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | सन २००५ पासून माहे ऑगस्ट २००८ पर्यंत संपूर्ण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची माहिती. | माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१ अपील निकाली काढण्यात येत आहे.

२ वरीलपैकी ज्या अपिलांमध्ये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती विहित मुदतीत उपलब्ध करून देण्याचे मान्य केले आहे, त्याबाबतचा पूर्तता अहवाल त्यांनी दि.१०.११.२००८ पर्यंत आयोगास सादर करावा.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

पुणे
दि. २४.१०.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि.२७.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| १ | अपील क्रमांक | ७५३/पुणे | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २ | अपीलकर्ता | श्री.अंगद नरहरीराव भोसले,<br>द्वारा , पवार, सर्व्हे ५३/५८, साईनाथनगर,<br>वडगावशेरी, पुणे -१४ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | गटविकास अधिकारी<br>पंचायत समिती कार्यालय मुखेड, जि.नांदेड | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गटविकास अधिकारी पंचायत समिती कार्यालय<br>मुखेड, जि.नांदेड | गैरहजर |

अपीलकर्ता श्री.अंगद नरहरी भोसले यांनी दि.२०.०९.२००६ रोजी दिलेल्या अर्जामध्ये दापका गुंडोपंत येथील दारिद्र्य रेषेखालील लोकांची यादी, सवलती, विविध योजनांच्या लाभार्थ्यांच्या याद्या, त्याबाबतचे नियम इत्यादी ७ मुद्यांची सन २००० ते २००६ या काळातील माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी पंचायत समिती कार्यालय, मुखेड यांनी संपूर्ण माहिती अपीलकर्त्यास दिल्याचे स्पष्ट केले. परंतु अपीलकर्त्याचे समाधान होत नसल्याचेही त्यांनी नमूद केले. माहिती दिल्याचे नमूद करुन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, मुखेड यांनी श्री.भोसले यांचे अपील निकाली ठेवले. मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केलेली कागदपत्रे व दिलेल्या माहितीच्या प्रती पाहता अपीलकर्त्यास माहिती दिल्याचे दिसून येते. माहिती विहीत मुदतीत दिली नसल्याचे श्री.भोसले यांनी नमूद केले. ' दिनांक २०.०९.२००६ आणि ०७.११.२००६ रोजी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागितल्याचे पत्र या कार्यालयाकडे दिल्याची नोंद या कार्यालयाकडे नाही. आणि सदरील तारखेत त्यांनी अर्ज दिलेलाही नाही, त्यामुळे त्यांना माहिती पुरविण्याचा प्रश्नच आला नाही. तसेच कार्यालयातील संपूर्ण रेकार्ड आणि रजिस्टर तपासले असता उपलब्ध रेकार्डवर कुठेही दिनांक २०.०९.२००६ व

०७.११.२००६ रोजी माहिती अधिकाराचा अर्ज आल्याची नोंद नाही. तसे संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्याने लेखी दिलेले आहे. तथापि दिनांक १४.०८.२००६, १९.०९.२००६, २६.१२.२००६, ३०.०४.२००७ रोजी ग्राम पंचायतीकडे माहितीच्या अधिकाराखाली त्यांनी अर्ज दिला होता. आणि दिनांक १९.०९.२००६ रोजी गट विकास अधिकारी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज पाठविला होता, तो प्रत्यक्ष दि.२६.०९.२००६ या कार्यालयास प्राप्त झाला. सदरील माहिती ग्रामसेवक, ग्राम पंचायत दापका (गुं) यांनी संबंधितास मुदतीमध्ये दिलेली आहे. त्यानंतर दि. १९.०९.२००६ रोजी तीच माहिती परत मागितल्यामुळे तत्कालीन गट विकास अधिकारी यांनी दि.३१.१०.२००६ रोजी अपील ठेवले होते. आणि संबंधिताला हजर रहाण्याची विनंती केली होती. परंतु दि.३१.१०.२००६ रोजी संबंधिताने परीक्षा असल्यामुळे हजर राहू शकत नाही, असे कळविले होते आणि मागितलेली संपूर्ण माहिती पुरविल्याचे ग्रामसेवक, दापका (गुं) यांनी दाखविल्यामुळे संबंधितास संपूर्ण माहिती मिळाली आहे, याची खात्री करुन अपील फेटाळले. दि.१९.०९.२००६ ची माहिती संबंधितास या अगोदर पुरविलेली असल्यामुळे परत पुरविण्याची गरज नाही म्हणून दिलेली नाही,' असे गट विकास अधिकारी यांनी त्यांच्या निवेदनात नमूद केले आहे. दि.१३.१२.२००७ रोजी पुनश्च माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी म्हटले आहे. हा तपशील लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १९/०९/२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपिल निर्गत कार्यक्रम दि.२४.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७६८ + ७६९ + ७७० / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.रमेश वाधवानी,<br>५८७, बुधवार पेठ, पाटील निवास,<br>गणेश अपार्टमेंट, पुणे ४११ ००२ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार ,<br>मौजे वडगाव, ता.मावळ, जि. पुणे | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार ,<br>मौजे वडगाव, ता.मावळ, जि. पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री.रमेश वाधवानी, रा. ५८७, बुधवार पेठ, पाटील निवास, गणेश अपार्टमेंट, पुणे ४११ ००२ यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन अपिले दि.११.०५.२००७ रोजी सादर केली होती. त्यामध्ये मौजे वडगाव मावळ येथील सर्व्हे नं.११४/२, ११४/३, ११४/४, २८३/८ संदर्भात संगणक ७/१२ उतारे, ८-अ उतारे, फेरफार इत्यादी मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्याचा उल्लेख आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांचा तपशील नोंदलेला नाही.

सदर अपिलांसोबत मूळ माहिती अर्ज प्रथम अपिलातील निकाल किंवा केलेले अर्ज इत्यादी कागदपत्रे जोडलेली नाहीत.

दि.२४.०६.२००८ 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये सदर अपिलांचा समावेश होता. त्यामध्ये अपीलकर्ता गैरहजर होता. त्यानंतर, अपिलांत केलेली माहिती मिळाल्याचे व सदर अपिले निकाली ठेवण्या संदर्भात दिनांक नसलेल्या पत्राद्वारे श्री.रमेश वाधवानी यांच्या नावाने लिहिलेल्या

पत्राने आयोगास कळविले. सदर पत्रावरील स्वाक्षरी ही आयोगाकडे केलेल्या अपिलांवरील स्वाक्षरीशी जुळत नाही, ही गंभीर बाब आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील सर्व अपिले निकाली ठेवण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार यांनी या अपिलावरील स्वाक्षरीच्या अनुषंगाने वस्तुस्थिती तपासून आयोगास अहवाल सादर करावा व आवश्यकतेनुसार पुढील कायदेशीर कार्यवाही करावी.

पुणे
दि. १२/०९/२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**